# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

सं. क्र. काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. १६८/२०११-१२ दिनांक :

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. रामचंद्र पांडुरंग सावंत,<br>मु.पो. व्हसपेठ, ता. जत, जि. सांगली. | अर्जदार |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १) | कार्यकारी अभिंयता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि. वितरण कंपनी मर्यादित,<br>सं व सु मंडळ कार्यालय, सांगली | विरुध्द पक्षकार |
| २) | कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली | |
| ३) | सहाय्यक अभियंता,<br>म,रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली | |

कोरम : १) श्री. बी.जी. पवार. अध्यक्ष,
२) श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव
३) श्री. जी.सी. लेले. सदस्य

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी.पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. रामचंद्र पांडुरंग सावंत, मु.पो. व्हसपेठ, ता. जत, जि. सांगली यांनी मंचाकडे अनुसूची अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ मधील कलम ६.१० नुसार वितरण कंपनी संख उप विभाग विरुध्द तक्रार दि. १५.२.२०१२ रोजी दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

तक्रारदार ग्राहकाने आपले घर क्र. ६४१ येथे नवीन वीज जोडणी मिळावी यासाठी चलन रु. १०००/- दि. ३.५.२०११ रोजी पावती क्र. ०२०२०१३ नुसार भरले आहे. चाचणी अहवाल दि.२२.५.२०११ रोजी दिलेला आहे. वितरण वाहिनीचा विस्तार असल्याने दि. २१.८.२०११ पर्यंत विद्युत पुरवठा मिळणे आवश्यक होते, तो आजतागायत मिळाला नाही. ग्राहकाने अंतर्गत तक्रार निवारण कक्षाकडे दि. १३.१०.२०११ ला तक्रार दाखल केली. अंतर्गत कक्षाचे दि. १५.१२.२०११ रोजी आदेश झाले. मंचाकडून अपेक्षित मदत - परवानेधारकाला एका निश्चित कालावधीत कृती मानके पूर्ण करण्याचे मंच आदेश देऊ शकते. त्यामुळे एका निश्चित कालावधीत वीज जोडणी देणे बाबत आदेश वि.प.स द्यावेत.

वितरण कंपनीने आपल्या दि. १०.४.२०१२ च्या लेखी अहवालात ग्राहकाने घरगुती वीज जोडणीसाठी दि. ३.५.२०११ ला चलन भरले आहे. तसेच ज्या ग्राहकांनी दि. ३१.३.२०११ पूर्वी चलन भरलेले आहे व चाचणी अहवाल सादर केलेले आहेत अशा ग्राहकांची कामे दि. ३१.३.२०१२ पर्यंत पूर्ण करण्याचे वरिष्ठ कार्यालयाचे आदेश आहेत. श्री. सावंत यांनी चलन दि. ३.५.२०११ रोजी भरले असल्याने दि. ३१.३.२०११ पूर्वी ज्या ग्राहकांनी चलन भरलेले आहे त्यांचे काम झाल्यानंतर श्री. सावंत यांचे काम जेष्ठता यादीप्रमाणे दि. १.४.२०१२ नंतर हाती घेण्यात येईल असे नमूद केले आहे. ग्राहकाची भरपाईची मागणी मान्य करण्यात येवू नये, कारण कृती मानके विनियम २००५ कलम १२.२ नुसार कृती मानकांमधील कमतरता दूर करण्यात आली नसल्यामुळे भरपाईचा कालावधी निश्चित होत नाही असे म्हटले आहे.

प्रस्तुत तक्रारीची सुनावणी दि. १२.४.२०१२ ला घेण्यात आली. त्यावेळी तक्रारदार गैरहजर. वि.प.तर्फे नोडल ऑफीसर श्री. क्षीरसागर, सहाय्यक अभियंता श्री. कदम, कनिष्ठ अभियंता श्री. कुलकर्णी उपस्थित.

वरील विवेचनावरुन खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) ग्राहकाची वीज जोडणी एका निश्चित कालावधीत व्हावी ही मागणी मंजूर करणे योग्य आहे काय ?

उत्तर : होय

कारणमिमांसा

उभयबाजूंच्या कथनानुसार ग्राहकाने आपले घर क्र. ६४१ येथे नवीन वीज जोडणीसाठी दि. ३.५.२०११ रोजी चलन भरले व दि. २२.५.२०११ रोजी चाचणी अहवाल दिलेला आहे. वितरण वाहिनीचा विस्तार असल्याने दि. २१.८.२०११ पर्यंत विद्युत पुरवठा मिळणे आवश्यक होते. तो आजतागायत दिला नाही हे स्पष्ट होते. कृती मानके विनियमातील तरतुदीचे पालन करण्यात वि.प.ला अपयश आले आहे. वि.प.ने आपल्या लेखी अहवालात ज्या ग्राहकांनी दि. ३१.३.२०११ पूर्वी चलन भरलेले आहे व चाचणी अहवाल सादर केले आहेत अशा ग्राहकांची कामे दि. ३१.३.२०१२ पर्यंत पूर्ण करण्याचे वरिष्ठ कार्यालयाचे आदेश आहेत असे म्हटले आहे, परंतु त्याची प्रत लेखी अहवालासोबत किंवा मंचासमोर सादर केली नाही. प्रस्तुत ग्राहकाचे वीज जोडणीचे काम दि. १.४.२०१२ नंतर हाती घेण्यात येईल असे म्हटले आहे. सेक्शन ४३ विद्युत कायदा २००३ व कृती मानके विनियम २००५ मधील तरतुदीनुसार ग्राहकाने वीज मागणी केल्यानंतर त्यांस विद्युत पुरवठा करणे परवानेधारकावर बंधनकारक आहे.

This document was created using SmartPDFCreator. To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

ग्राहकास वीज जोडणी देण्यास झालेल्या विलंबाबद्दल वि.प.ने दिलेली कारणे संयुक्तिक वाटत नाहीत. ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल विनियम २००६ मधील कलम ८.२ नुसार मंच ग्राहकाचे गाऱ्हाणे ठराविक मुदतीत दूर करण्याचे आदेश देऊ शकते. या ठिकाणी घरगुती वीज जोडणी देण्यास कांही तांत्रिक अडचण आहे का ? याबद्दल वि.प.ने कांही स्पष्टीकरण दिले नाही. दि. ३१.३.२०११ पूर्वी ज्या ग्राहकांनी चलन भरलेले आहे त्यांचे काम झाल्यानंतर श्री. सावंत यांचे काम जेष्ठता यादीप्रमाणे दि. १.४.२०१२ नंतर हाती घेण्यात येईल असे वि.प.ने लेखी अहवालात नमूद केले आहे, यामुळे कृती मानकाची किंवा सेक्शन ४३ विद्युत कायदा २००३ मधील तरतुदीची पूर्तता करण्यास वि.प. असमर्थ आहे असे म्हणू शकत नाही. श्री. कदम, सहाय्यक अभियंता, संख उप विभाग यांनी ग्राहकास दि. ३०.५.२०१२ पर्यंत वीज जोडणी देतो असे मंचासमोर सुनावणीचेवेळी सांगितले. मुद्दा क्र.१ चे उत्तर होय असे देण्यात येत आहे. तक्रारदारानेआपल्या तक्रारीत भरपाईबद्दल कुठलीही मागणी किंवा भाष्य केलेले नाही. नोडल ऑफीसर यांनी आपल्या दि. १०.४.२०१२ च्या लेखी अहवालात भरपाईची मागणी मान्य करण्यात येवू नये असे कथन केले आहे. खालील प्रमाणे आदेश -

## <u>आदेश</u>

१) तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) वितरण कंपनीने मंचासमोर कबूल केल्याप्रमाणे ग्राहकास दि. ३०.५.२०१२ पर्यंत त्यांचे घर क्र. ६४१ येथे वीज जोडणी द्यावी व त्याचा पूर्तता अहवाल मंचास द्यावा.

३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखे-पासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com